# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.03.2025** **वार-शनिवार**

---

**निधन**

ज्येष्ठ लेखिका डॉ. मीना सुधाकर प्रभू यांचं आज पुण्यात निधन झालं. त्या ८५ वर्षांच्या होत्या. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांची प्रवास वर्णन असलेली पुस्तके प्रसिद्ध होती. प्रभू यांनी जगातल्या अनेक देशांमध्ये प्रवास केला होता. प्रवास वर्णनांवरील त्यांचे लेख विविध वृत्तपत्रे, मासिकांमध्ये प्रकाशित झाले होते. “ माझं लंडन “ हे त्यांचे पहिले प्रवास वर्णन पुस्तक होते. जगातील निरनिराळ्या ठिकाणांची ज्ञान देणारी रंजक माहिती त्यांनी दिली. इजिप्तायान आहे तुर्कनामा , ग्रीकांजली चिनी माती अशी अनेक पुस्तके लोकप्रिय झाली. गोवा इथं झालेल्या महिला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होत. तसेच त्यांना दि .बा . मोकाशी पारितोषिक, गो.नी.दांडेकर स्मृती पुरस्कार, न.चिं.केळकर पुरस्कार , महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार आदि पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलं होतं.

**राष्ट्रीय-बाल-स्वास्थ्य-कार्यक्रम-मोहीम**

सर्वांनी मिळून आरोग्य तपासणी मोहिमेला संपूर्ण राज्यभर यशस्वी करून प्रत्येक बालकाला सशक्त आणि निरोगी जीवन देण्याचं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यात केलं. आरोग्य विभागाच्यावतीनं राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम विशेष राज्यस्तरीय मोहीमेचं उद्घाटन करताना ते बोलत होते. सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे दूरस्थ पद्धतीने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या मानसिक ताणाचा विचार करता गरजेनुसार तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी आणि समुपदेशन करण्यात येणार आहे. तसच महिलांमध्ये कर्करोगाचं वाढतं प्रमाण लक्षात घेता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून लस देण्याबाबत राज्यशासन विचार करत असल्याचं पवार म्हणाले.नव्या पिढीला आरोग्यसंपन्न जीवन देण्यासाठी ही मोहिम यशस्वी करावी असं आवाहन आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं.
तर एकही विद्यार्थी उपचारापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेवून ही मोहिम यशस्वी करण्याचं आवाहन शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केलं.

**जेई लसीकरण मोहीम**

पुणे महानगरपालिकेच्या 15 क्षेत्रीय कार्यालय स्तरावर  जपानी एन्सेफलायटीस म्हणजे जे ई लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. याअंतर्गत पुणे शहरातील 1 ते 15 वर्षे वयोगटातील 10 लाख 43 हजारांहून अधिक मुला-मुलींचं लसीकरण करण्याचं उद्दीष्ट असल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, रायगड आणि परभणी या जिल्ह्यांमध्ये आजपासून ही मोहीम राबविण्यात येणार आहे. जपानी एन्सेफलायटीस हा मेंदूचा विषाणूजन्य संसर्ग आहे. तो डासांच्या चाव्याद्वारे पसरतो. जे.ई. लसीकरण हे पुणे शहरातील सर्व शाळा तसच अंगणवाडी याठिकाणी आयोजित केलं जाणार असल्याचं आरोग्यप्रमुख डॉक्टर नीना बोराडे यांनी सांगितलं.

**गावे**

पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या 32 गावांत पथदिवे लावण्यासाठी महापालिकेने 5 कोटी रुपयांचे एलईडी दिवे खरेदी केले आहेत. महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.

**दंत**

दातांचे आरोग्य सांभाळण्यासाठी त्यांची योग्य निगा राखण्याबरोबरच योग्य आहार घेणे ही काळाची गरज झाली असल्याचं मत भारतीय वैद्यकीय संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर राजन संचेती यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. पुण्यात प्रथमच आयोजित मौखिक प्रदर्शनाचं उद्घाटन बालगंधर्व  कलादालनात करताना ते बोलत होते. दातांच्या विविध समस्या आणि त्यावरील उपाय चित्ररूपात आणि प्रात्यक्षिकातून दाखविण्यात आले.

**भेट**

पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेच्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी, शतायुषी मराठी व्याकरण तज्ज्ञ, प्राध्यापक यास्मिन शेख यांची काल त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त केलेल्या या उपक्रमात विद्यार्थी आणि शिक्षकांनी त्यांच्याशी संवाद साधताना, त्यांच्या अनुभव आणि कर्तुत्वाचा परिचय करून घेतला. यावेळी प्रशालेच्यावतीने मुख्याध्यापक चारुता प्रभुदेसाई यांनी त्यांचा गौरव केला.

**संमेलन**

गांधी विचार साहित्य संमेलनाचं आयोजन सात मार्चपासून तीन दिवस पुण्यात गांधीभवन इथं करण्यात आलं आहे. तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ संपादक आणि विचारवंत सुरेश द्वादशीवार असून राज्यसभा खासदार मनोजकुमार झा यांच्या हस्ते संमेलनाचं उद्घाटन होणार असल्याची माहिती संयोजक आणि गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉक्टर कुमार सप्तर्षी तसच स्वागताध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी दिली.

**सुर**

पुणे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या 'पीएमपीएमएल'च्या बसमध्ये सुरक्षिततेच्या कारणास्तव महिला सुरक्षा रक्षक नेमण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. तीन दिवसांपूर्वी स्वारगेट एस. टी स्थानकामध्ये तरुणीवर झालेल्या गैरप्रकाराच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने हा निर्णय घेतला आहे.

**स्पर्धा**

लायन्स क्लब ऑफ पुणे यांच्यावतीनं दिव्यांग आणि मूकबधीर विद्यार्थ्यांसाठी जलतरण स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यामध्ये 16 वर्षांखालील गटात आदिराज उल्हे आणि आदिती गाडे, गतिमंद गटात आर्य दिवाण, आणि साक्षी सुतार, अंध गटात देवदास पारधी, कर्णबधीर गटात राज पारधी आणि श्रुती जगदाळे यांनी सुवर्णपदक पटकावलं. गेल्या 29 वर्षांपासून स्पर्धांचं आयोजन करण्यात येत आहे.

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 34 अंश तर किमान 17 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**